# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र. १०५०/२०१८/छ.संभाजीनगर**
**(द्वितीय अपील क्र. ४८८४ /२०१७ मध्ये)**

श्री. प्रेमदास तुकाराम चव्हाण,रा. बनवाडी तांडा,पो.जटवाडा,जि.छत्रपती संभाजीनगर : तक्रारदार

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर,जि.छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी

**निर्णय**
**(सुनावणी दि.०७.११.२०२३ )**

तक्रारदार यांनी दि.०३.१०.२०१८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

"तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय छत्रपती संभाजीनगर आणि अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार तहसील कार्यालय छत्रपती संभाजीनगर चे अपिल क्र४८८४/२०१७चे आदेश ९.०७.२०१८ची संबंधीतांनी आज पावेतो पुर्तता: केलेली नाही त्यामुळे नाईलाजास्तव (कलम) १८ अन्वये तक्रार अर्ज करण्यात येत आहे.तरी कृपया सदर अर्जाचा सहानुभुतिपुर्वक विचार करुन न्याय देण्याची कृपा करावी."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.४८८४/२०१७ मध्ये दि२८.०३.२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,औरंगाबाद यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. असा आदेश दिला आहे. "

सदर प्रकरणावर यापूर्वी दि.२८.०८.२०१९, दि.१७.०२.२०२०, दि.२३.०३.२०२०, दि.३१.०८.२०२१, दि.१४.०६.२०२३ रोजी सुनावणी झाल्या आहेत, परंतु सदरील प्रकरणात सुनावणी परिपूर्ण होण्यासाठी आज दि.७.११.२०२३ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे.

श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर व श्री.परेश जी.चौधरी ,विद्यमान जन माहिती अधिकारी तथ नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर यांना दि.०३.०८.२०२३ रोजी सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी व माहिती देण्यात आली अथवा कसे याबाबतचा खुलासा सादर करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली,

त्यानुसार श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर (सध्या तहसीलदार,तहसील कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत) दि.१२.०९.२०२३ रोजी त्यांनी खुलासा सादर केला.त्यामध्ये त्यांनी कथन केले की, खुलासा सादर करण्यात येतो की, संबंधित अर्जदार यांनी या कार्यालयाकडे माहिती अर्ज केल्यानतंर सदर अर्जानुसार माहितीचा शोध घेण्याचे कामकाज कार्यालयामध्ये सुरु होते. सदरची माहिती हि तलाठी कार्यालयाशी संबंधित असल्याने तत्कालीन तलाठी सज्जा जटवाडा.ता.जि.छत्रपती संभाजीनगर यांना प्रकरणामध्ये अर्जदार यांचे अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती कार्यालयास उपलब्ध करुन देणेबाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या.तलाठी यांचेकडुन माहिती मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे अर्जदार यांना माहिती पुरविता आलेली नाही. यापुढे माहिती अधिकार अर्ज प्राप्त होताच त्यामध्ये तीस दिवसाच्या आत कार्यवाही करण्यात येईल व भाविष्यात अशी चुक होणार नाही याबाबत दक्षता घेत आहे. परंतु सदर खुलाश्याचे अवलोकन केले असता त्यांनी आवश्यक तो पुरावा प्राप्त नाही/ सादर केला नाही.त्यामुळे त्यांच्या लेखी खुलाश्यामध्ये तथ्यांश दिसून येत नाही.

आज दिनांक ०७.११.२०२३ रोजीच्या सुनावणीस तक्रारदार, श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर (सध्या तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत ) व श्री.परेश जी.चौधरी ,विद्यमान जन माहिती अधिकारी तथ नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

तसेच श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर (सध्या तहसीलदार,तहसील कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत )हे आज दि.०७.११.२०२३ रोजीच्या सुनावणीसाठी कोणतीही पूर्व परवानगी न घेता ते गैरहजर राहिले आहेत. त्यांना या प्रकरणात काहीही म्हणायचे नाही असे दिसून येत आहे. या सर्वबाबींमुळे ते स्वत:हुन शिक्षेसाठी पात्र ठरत आहे.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाच्या उल्लंघन करणा-या ठरतात. या प्रकरणी श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर यांनी अशा सर्व कृती करुन अधिनियमातील कलम २०(१) च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस स्वत:ला पात्र ठरविलेले आहे. त्यामुळे श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर (सध्या तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत) यांना याप्रकरणी रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात वर नमुद केल्याप्रमाणे जबाबदार श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर (सध्या तहसीलदार,तहसील कार्यालय,फुलंब्री,जि.छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत) यांचेकडुन शास्तीची रक्कम वसूल करून ती खालील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९

(८) (क) व १९ (७) अन्वये जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष** :- **००७०- इतर प्रशासनिक सेवा**
**६०- इतर सेवा**
**८००- इतर जमा रक्कम**
**१८- माहितीचा अधिकार ००७०-००६-१**

वर नमुद केल्याप्रमाणे शास्तीची वसुली जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर यांनी करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

उपरोक्त विवेचनानुसार श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर (सध्या तहसीलदार, तहसील कार्यालय, फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत) यांना या प्रकरणी रु.२५,०००/-इतकी शास्ती करण्यात येत आहे. तसेच सदर शास्तीची रक्कम वसूल करुन उपरोक्त दिलेल्या लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (८) (क) व १९(७) अन्वये जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. यानुसार तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र.१०५०/२०१८/छत्रपती संभाजीनगर / एबीजे/जावक क्र. 19626 दि.26/12/2023

प्रत: माहिती तथा कार्यवाही/अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. श्री.डॉ.कृष्णा कानगुले तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार तहसील कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर (सध्या तहसीलदार,तहसील कार्यालय,फुलंब्री,जि.छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत) यांना मार्फत :- जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर
२. जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर